**प्रसिद्धी पत्रक**

- **महापालिका शाळेतील विद्यार्थिनीला व्यावसायिक कार्यक्रमात संधी**
- **मनपा शाळांच्या स्नेहसंमेलनातून झाली निवड**

**मिरा-भाईंदर, २२ जानेवारी २०२५:** मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळेत दहावीत शिकणाऱ्या प्रीती गायकवाड या विद्यार्थ्यांनीला व्यावसायिक संगीत-नृत्य कार्यक्रमात लावणी सादर करण्याची संधी मिळाली आहे. महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर (भा.प्र.से) यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या कलेसाठी मंच उपलब्ध व्हावा या उद्दीष्टाने आयोजित केलेल्या स्नेहसंमेलनातून प्रीतीची निवड करण्यात आली आहे.

दरवर्षी प्रत्येक शाळेचा स्वतंत्र वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा होत असतो, मात्र यंदा महानगरपालिकेने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना एक मोठा मंच मिळावा यासाठी सर्व ३६ शाळांचा एकत्र स्नेहसंमेलन गानसम्राज्ञी लता मंगेशकर नाट्यगृहात आयोजित केला होता. विद्यार्थ्यांची कला पाहता यावी यासाठी महापालिका आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर (भा.प्र.से) यांनी या स्नेहसंमेलनावेळी मनोरंजन क्षेत्रातील मान्यवरांना बोलावले होते. यात शुटींग स्टुडिओचे मालक, संचालक, मनोरंजन कार्यक्रम संयोजक आदी उपस्थित होते.

या स्नेहसंमेलनादरम्यान विविध नाविन्यपूर्ण नृत्याविष्कार विद्यार्थ्यांना मार्फत सादर करण्यात आले होते. यात मीरा-भाईंदर महापालिकेच्या काशिगाव शाळा क्रमांक ४ मधील दहावीत शिकणारी प्रीती गायकवाड हिने पारंपरिक लावणी सादर केली होती. तिच्या नृत्याला उपस्थितांकडून मोठी दाद मिळाली होती. तसेच तिचे सर्व शिक्षक, अधिकारी वर्ग आणि आयुक्तांनीही कौतुक केले. यावेळी प्रीती गायकवाड या विद्यार्थिनीची दखल तेथे उपस्थित मनोरंजन क्षेत्रातील मान्यवरांनी घेतली आणि पुढील काही दिवसांतच प्रीतीला लावणीसम्राज्ञी मेघा घाडगे यांच्या ‘रंगबाजी’ या व्यावसायिक संगीत-नृत्य कार्यक्रमात लावणी सादर करण्याची संधी दिली.

प्रीती सर्वसामान्य कुटुंबातील आहे. लहान घर, हालाखीचीची परिस्थिती आणि कसलेही व्यावसायिक प्रशिक्षण नव्हते. अशावेळी प्रीतीने शाळेत नृत्याचा सराव केला. यावेळी शाळेने आणि शाळेच्या शिक्षकांनी तिला पाठिंबा दिला. त्यातच हवामान बदलामुळे तिला ताप आला होता. पण तिने हार मानली नाही मिळालेली संधी वाया न घालवण्याचे ठरवून जिद्दीने सर्व स्थितीवर मात करत या व्यावसायिक कार्यक्रमात नृत्य सादर केले. यावेळी प्रीतीची नृत्य कला पाहून, लावणीसम्राज्ञी मेघा घागडे यांनी प्रीतीला आशिर्वाद दिले आणि भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.